वर्ष- १० | अंक- ४० | मुंबई, मंगळवार, २० ऑगस्ट ते २६ ऑगस्ट २०२४ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

# पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024
POLICE BATMI PATRA
● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 गणेशोत्सवा आधी रस्ते चमकणार मुख्यमंत्री शिंदेंकडून गणेशभक्तांना 'टोल फ्री' गिफ्ट

3 → मुली, तू जन्मूच नकोस...

या '3' घरगुती फ्रूट मास्कने करा, सनटॅनच्या समस्येला अलविदा! ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## राज्यातील आपला दवाखाना होणार डिजिटल

### मुंबई, ठाणे वगळता राज्य सरकारकडून राज्यभरात सुरू करण्यात येत असलेले ह्यहिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आता डिजिटल होणार आहे

**मुंबई :**

मुंबई, ठाणे वगळता राज्य सरकारकडून राज्यभरात सुरू करण्यात येत असलेले ह्यहिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आता डिजिटल होणार आहे. राज्यातील कोणत्याही आपला दवाखानामध्ये उपचारासाठी जाणाऱ्या नागरिकाच्या आजाराचा पूर्व इतिहास एका क्लिकवर डॉक्टरांना कळणार आहे. त्यामुळे रुग्णांवर उपचार करणे सुलभ होणार आहे. आपला दवाखाना डिजिटल करण्याचे काम व्यावसायिक सामजिक दायित्व (सीएसआर) निधीमधून करण्यात येणार आहे.




राज्यातील विविध शहरातील झोपडपट्टयां, ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक व गोरगरीबांना मोफत आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी यासाठी राज्यात ७०० आपला दवाखाना सुरू करण्याचे नियोजन आहे. आतापर्यंत सुरू झालेल्या ३६६ दवाखान्यांच्या माध्यमातून २७ लाख ६६ हजार ७३७ रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत. त्यातील ३ लाख ३९ हजार ४२५ रुग्णांची मोफत प्रयोगशाळा तपासणी तर ४७ हजार ५६४ गर्भवती मातांची तपासणी करण्यात आली आहे. मंजूर आपला दवाखान्यापैकी ३३४ दवाखाने कार्यान्वित करण्याची प्रक्रिया जिल्हास्तरावर सुरू आहे. रुग्णांना होणारा लाभ लक्षात घेता राज्य सरकारने सर्व आपला दवाखान डिजिटल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्रोटिन ईगर्व्ह टेक्नोलॉजी लिमिटेड या कंपनीकडून मिळणाऱ्या व्यावसायिक सामाजिक दायित्त्व निधीमधून प्रायोगिक तत्त्वावर डिजिटल आरोग्य परिवर्तन उपक्रम सुरू करण्यात येणार आहे.

आपला दवाखाना डिजिटल झाल्याने दवाखान्यातील औषधांचा साठा, कर्मचा[]यांची संख्या, रुग्णांवर करण्यात येणारे उपचार हे एका क्लिकवर सहज कळणार आहेत. आपला दवाखान्याद्वारे संकलित करण्यात येणारी रुग्णांची माहिती ही पूर्णतः गोपनीय ठेवण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे एखादा नागरिक त्याच्या जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात गेल्यास तेथील आपला दवाखान्याची माहिती रुग्णाला सहज व्हावी यासाठी आपला दवाखान्याचे जिओ टॅगिंग करण्यात येणार आहे. त्यासाठी लागणारी चिकित्सा व्यवस्थापन प्रणाली, डॉक्टरांना प्रशिक्षण, मोबाईल अॅप, दवाखान्याची माहिती संकलित करण्यासाठी स्वतंत्र डॅशबोर्ड प्रोटीन कंपनीद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

आपला दवाखाना डिजिटल करण्यासाठी प्रोटिन ईगर्व्ह टेक्नोलॉजी लिमिटेड कंपनीसोबत झालेल्या करारानुसार पुढील दोन वर्षे ही सेवा मोफत दिली जाणार आहे. त्यानंतरच्या खचार्साठी प्रोटीन कंपनीद्वारे स्वतंत्र निधीची व्यवस्था करण्यात आली आहे.




## घरफोडी चोरीतील अट्टल गुन्हेगारास अटक करून सुमारे १ लाख ३ हजार रुपये किमतीचा ऐवज पोलिसांनी केला जप्त

**काशिगांव -**

घरफोडी करुन चोरी करणा-या साराईत आरोपीला अटक करुन त्याच्याकडुन रोख रक्कम व मोबाईल फोन असे एकुण १,०३,०००/ रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात काशिगांव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश . मिळालेल्या माहितीनुसार दिनांक १५.०८.२०२४ रोजी मोहम्मद फैजान फैजाज सिद्धिकी, रा. ओम कॉप्लेक्स बिल्डींग नंबर १३ रुम नंबर ०३, बस स्टॉप नंबर २२, मिरा रोड पुर्वे, ठाणे यांनी काशिगांव पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली की ते वरिल ठिकाणी त्यांच्या गांवातील मित्रांसोबत राहत आहे. दिनांक १३.०८.२०२४ रोजी रात्री ११.०० वा. नंतर ते त्यांच्या घरी त्यांच्या मित्रांन सोबत झोपले होते व दिनांक १४.०८.२०२४ रोजी सकाळी ०८.०० वा.सुमारास ते झोपेतुन उठले असता त्यांना त्यांच्या घराचा दरवाज्या उघडा दिसला व घरातील सामान अस्ताव्यस्त दिसले त्यावेळी त्यांनी त्यांचा मोबाईल फोन पाहिला असता तो त्यांना मिळुन आला नाही तेव्हा त्यांनी त्याच्या सोबत झोपलेले त्यांचे मित्र झियावुन, अरबाज व जॅकी यांना झोपेतून उठवले असता त्यांनी सुद्धा त्यांचे मोबाईल फोन झोपण्याच्या बिछाण्यात पाहिले असता ते त्यांना मिळुन आले नाही त्यावेळी त्यांची खात्री झाली कि, कोणीतरी अनोळखी इसमाने रात्रीच्यावेळी त्यांच्या घरात प्रवेश करुण त्यांचे ०४ मोबाईल फोन व १२,०००/ रु.रोख रक्कम चोरी करून नेली म्हणुन त्यांनी काशिगांव पोलिस स्टेशन येथे अनोळखी इसमा विरुध गुन्हा नोंद करण्यात आला होता.

पोलीस ठाणेच्या हद्दीत वारंवार मोबाईल चोरीच्या तक्रारी वाढल्याने पोलिसांना वरिष्ठांनी आरोपीचा शोध घेवून नमुद गुन्हे उघड करण्याच्या सुचना दिल्या होत्या त्या प्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज जप्त केले तसेच घटनास्थळाच्या आजुबाजुच्या २५ पेक्षा जास्त ठिकाणाचे सीटीटीव्ही फुटेज चेक करुण तसेच मोबाईल तांत्रिक विश्लेषणातुन नमुद गुन्ह्यात आरोपी दुर्गेश प्रेमचंद गुप्ता, रा. मुधोर्खाडी, साई बाब मंदीराजवळ, भाईंदर पश्चिम यांस अटक केली आहे. नमुद गुन्ह्यातील फियार्दी यांचे चोरी गेलेले महागडे मोबाईल फोन व रोख रक्कम तसेच आरोपीने इतर वेगवेगळ्या ठिकाणी चोरी केलेले विविध कंपनीचे मोबाईल असे एकुण ०८ मोबाईल फोन व १०,७००/ रु.रोख रक्कम असे एकुण १,०३,०००/ रु.किं.चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. अटक आरोपी दुर्गेश गुप्ता हा घरफोडी, जबरी चोरी इत्यादी गुन्हे करण्यात साराईत असुन त्याच्या विरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्याचा अभिलेख पाहिला असता त्याच्या विरुद्ध १० पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत.

वरिल नमुद गुन्ह्यातील अटक आरोपीकडे पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुलकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप निरीक्षक किरण बगडाणे व पोलिस उप निरीक्षक अभिजीत लांडे, तपासी अंमलदार राहुल वाळुंज हे करत आहे. सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलिस उप आयुक्त परिमंडळ ०१, डॉ विजय मराठे, सहाय्यक पोलिस आयुक्त, मिरारोड विभाग, राहुलकुमार पाटील, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, काशिगांव पोलिस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली काशिगांव पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी / अंमलदार यांनी केली आहे.

## हद्दपार केलेल्या गुन्हेगाराला पोलिसांनी मोठ्या शिताफीने केली अटक



**भाईदर -**

तडीपार करण्यात आलेल्या आरोपीस अटक करण्यास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश. सविस्तर माहिती अशी कि शिवप्रसाद कुशाल शेट्टी, रा. बी / १०५, मनिष काम्पेक्स, कस्तुरी इस्टेट, भाईदर पुर्व याच्या विरुध्द लोकांची फसवणुक करणे तसेच दिलेली रक्कम परत करु नये या करीता दुखापत करणे तसेच महीला अत्याचार यासारखे सन २०११ ते २०२३ या कालावधीत सलग नवघर पोलीस स्टेशन येथे ०३ गुन्हे, मिरारोड पोलीस स्टेशन येथे ०३ गुन्हे, उत्तन पोलीस स्टेशन येथे ०१ गुन्हा, नयानगर पोलीस स्टेशन येथे १ गुन्हा असे एकुण ०८ गुन्हे दाखल असुन ते न्यायप्रविष्ठ आहेत. सदर गुन्हयात अटक होवुनही त्याच्या गुन्हेगारी वृत्तीत बदल झालेला नाही. त्याचे समाजविघटीत कृत्यामुळे समाजाचे व आजुबाजुच्या परीसरात राहणा[]्या नागरीकांच्या जिवीतास तसेच मालमत्तेस धोका नाकारता येणार नाही म्हणून मा. पोलीस उप आयुक्त, परीमंडळ क्र. ०१ यांच्या दि.०९.०४.२०२४ च्या आदेशा प्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम प्रमाणे शिवप्रसाद कुशाल शेट्टी, वय - 3४ वर्षे रा. ए विंग, रुम क्र. ४०१, श्रीनाथ वंदना अपार्टमेन्ट, गोन्डन नेस्ट फेज क्र. १, भाईदर पुर्व यास ठाणे जिल्हा, पालघर जिल्हा, मुंबई शहर, मुंबई उपनगरे या कार्यक्षेत्रातान दोन वर्षाकरीता तडीपार करण्यात आलेले होते. तसेच पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबुरे यांनी कार्यक्षेत्रातील गंभीर गुन्हयातील पाहीजे / फरारी आरोपीचे शोधा करीता आदेश दिलेले होते. दिनांक १३.०८.२०२४ रोजी सहा. पो. निरी नितीन बेंन्द्रे, पोहवा आजीज आसीफ मुल्ल, पोहवा अनिल रामदास नागरे असे गुन्हेगार वॉच पेट्रोलिंग फिरत असतांना भाईंदर पुर्व येथील शिवराज चेम्बरमधील सिल्व्हर क्लुड, हॉटेलचे गेट बाहेर हद्दपार असलेला शिवप्रसाद कुशाल शेट्टी हा उभा असलेला पथकास दिसुन आल्याने त्यास ताब्यात घेतले . हददपार असतानाही तो वरील ठिकाणी कोणतीही परवानगी न घेता आल्याने मिळुन आला त्याचे विरुध्द नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आलेली आहे. सदरची कारवाई ही पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबुरे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पो. निरीक्षक राहुल राख, पोनिरी. धनांजय पोरे, सपोनि. दत्तात्रय सरक, सपोनि. नितीन बेन्द्रे, पोउपनिरी. हितेंन्द्र विचारे, सहा.पो.उप.निरी. श्रीमंत जेधे, सहा.पो. उप.निरी.मनोहर तावरे, पोहवा. अनिल नांगरे, पोहवा. आसीफ मुल्ला, हनुमंत सुर्यवंशी, संग्राम गायकवाड, राजविर संधु, प्रविणराज पवार, सतिष जगताप, राजाराम काळे, महेश वेल्हे, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, संतोष मदने, पोशि.अंकीत सुतार, नितीन राठोड, साकेत माघाडे, अंगद मुळे, मसुब सचीन चौधरी सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा



# गणेशोत्सवाआधी रस्ते चमकणार
## मुख्यमंत्री शिंदेंकडून गणेशभक्तांना ‘टोल फ्री’ गिफ्ट




**मुंबई** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यात सुरू होणाऱ्या गणेशोत्सावाआधी मोठी घोषणा केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत यंदा गणेशोत्सवासाठी गावी जाणाऱ्या गणेशभक्तांना टोलमधून सूट देण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे गणेशोत्सव काळात प्रवासा दरम्यान प्रवाशांना टोल भरावा लागणार नाही. राज्य सरकारने दिलेली ही टोलमधील सूट राज्य महामार्गांच्या टोलनाक्यांवरच लागू असेल. सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीनंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी इको बाप्पा या ॲपचंही लोकार्पण केलं. या ॲपमध्ये सर्वसामान्यांना गणेशोत्सवाशी संबंधित सर्व माहिती मिळेल. गणेशोत्सवानिमित्त मुख्यमंत्र्यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे कायदा आणि सुव्यवस्था आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. त्याशिवाय मुख्यमंत्र्यांनी राज्यभरात गणेशोत्सव इको-फ्रेंडली साजरा करण्याचं सांगितलं आहे. तसंच गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांना गणपतीआधी आगमन आणि विसर्जन मार्गावरील सर्व खड्डे तात्काळ भरण्याचे आदेश दिले आहेत. तसंच एकनाथ शिंदे यांनी मुंबईसह राज्यातील सर्व शहरांमध्ये कृत्रिम तलावांची संख्या वाढवण्याच्याही सूचना दिल्या आहेत.

राज्यातील प्रमुख शहरांमधील गणपती आगमन आणि विसर्जन मार्गावरील खड्डे राज्यातील प्रमुख शहरांमधील गणपती आगमन आणि विसर्जन मार्गावरील खड्डे बुजवण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. खड्डे त्वरित बुजवण्यासाठी आधुनिक मटेरियल रॅपिड क्विक सेटिंग हार्डनर-एम सिक्स्टीचा वापर करण्याचं मुख्यमंत्र्यांनी महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.

लाखो गणेश भक्तांना होणार फायदा गणेशोत्सवासाठी राज्यातील विविध भागातील गणेश भक्त आपल्या गावी जातात. अशात प्रवाशांना मोठ्या प्रमाणात टोल भरावा लागतो.

मात्र आता गणेशोत्सव काळात टोलमध्ये सूट दिल्याने याचा अनेकांना फायदा होणार आहे. त्याशिवाय गणेशोत्सवासंबंधी अनेक सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. मोठ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या ठिकाणी आरोग्य पथकं, रुग्णवाहिका आणि अग्निशमन दल तैनात करण्याचं आदेश दिले आहेत.

अगदी काही दिवसांवर गणेशोत्सव आला आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने आवश्यक कामांना प्राधान्य द्यावं असे आदेश देण्यात आले आहेत.

## दहिसर, कांदिवली, दादर, पनवेल रेल्वे स्थानकांचा होणार कायापालट
## अमृत भारत स्टेशन योजनेत आणखी चार स्थानकांचा समावेश



**मुंबई** : अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत देशभरातील रेल्वे स्थानकांचा चेहरामोहरा बदलण्यात येत आहे. या योजनेच्या यादीत मुंबईतील आणखी चार रेल्वे स्थानकांची भर पडली आहे. यामध्ये मध्य रेल्वे मार्गावरील दादर, हार्बर मार्गावरील पनवेल आणि पश्चिम रेल्वे मार्गावरील कांदिवली आणि दहिसर या रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे काही वर्षांत चार स्थानकांचाही कायापालट होणार आहे.

रेल्वे मंत्रालयाने अमृत भारत स्टेशन योजना केंद्र सरकारच्या वतीने राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेत देशभरातील १ हजार ३२४ रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. राज्यातील १२८ रेल्वे स्थानकांचा या यादीत समावेश झाला आहे. या योजनेनुसार नुकतेच या यादीत मध्य रेल्वेच्या हार्बर मार्गावरील पनवेल आणि मुख्य मार्गावरील दादर रेल्वे स्थानकांची भर पडली आहे. त्याचप्रमाणे पश्चिम रेल्वे मार्गावरील कांदिवली आणि दहिसर या दोन रेल्वे स्थानकांचा या यादीत समावेश करण्यात आला आहे. योजनेत मास्टर प्लॅन तयार करणे आणि स्टेशनवरील सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी टप्प्याटप्प्याने त्यांची अंमलबजावणी करणे समाविष्ट आहे. यामध्ये प्रवासी क्षेत्र, शौचालये, लिफ्ट/एस्कलेटर, स्वच्छता, वाय-फाय, स्थानिक उत्पादनांसाठी किऑस्क, 'एक स्थानक एक उत्पादन', माहिती प्रणाली, एक्झिक्युटिव्ह लाउंज इत्यादीद्वारे स्थानकावरील गरज लक्षात घेतल्या जाणार आहेत.

# ‘लाडक्या बहिणीं’कडून दहापट वसुली
## खासगी आधार केंद्रांकडून भरमसाट रकमेची मागणी



**मुंबई** : काही दिवसांपूर्वी राज्य सरकारने महिलांसाठी लाडकी बहीण ही योजना सुरू केली असून या योजनेत आधारकार्ड महत्त्वाचा पुरावा आहे. मात्र अनेकांच्या आधारकार्डावर काही चुका असून दुरुस्तीसाठी खासगी आधारकार्ड केंद्र चालक मोठ्या प्रमाणात लूट करीत आहेत. ५० ते १०० रुपये शुल्क असताना ५०० रुपये ते दोन हजार रुपये घेण्यात येत आहेत. महिलांची लूट करणाऱ्यांविरोधात सरकारने कडक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

राज्य सरकारने जुलै महिन्यात लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेनुसार राज्यातील महिलांना दरमहा (पान ८ वर)(पान १ वरून) १५०० रुपये देण्यात येणार असून यासाठी महिलांना आधार कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड, रहिवासी प्रमाणात आणि उत्पनाचा दाखल सादर करणे बंधनकारक आहे. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महिलांच्या खात्यात हे पैसे जमा होणार आहेत. मात्र अनेक जणींच्या आधाराकार्डमध्ये काही चुका आहेत. त्यांच्या दुरुस्तीसाठी महिलांना आधार केंद्रांवर हेलपाटे मारावे लागत आहेत. याचा फायदा घेत खासगी आधार केंद्र चालक महिलांची मोठी लूट करीत आहेत. टपाल कार्यालय अथवा बँकांमधील आधार केंद्रांवर नाव दुरुस्ती, मोबाइल नंबर जोडणे आणि इतर दुरुस्तीसाठी केवळ ५० ते १०० रुपये घेण्यात येत आहेत. मात्र खासगी आधार केंद्रांमध्ये याच कामांसाठी ५०० रुपये ते दोन हजार रुपये मागितले जात आहेत.

एका खासगी आधार केंद्रात मोबाईल नंबर कार्डला जोडण्यासाठी ५०० रुपये मागण्यात आले. मात्र टपाल कार्यालयातील हेच काम ५० रुपयात झाल्याचा अनुभव मालती वाघमारे यांनी सांगितला. लाडकी बहीण योजना झाल्यानंतर अर्ज भरून घेण्यासाठी महिलांकडे पैसे मागण्यात आले होते. प्रसारमाध्यमांनी याबाबत वृत्त प्रसिद्ध करताच सरकारने कारवाई केली. अशीच कारवाई खासगी आधार केंद्रांवरही करण्याची मागणी होत आहे.

## गोविंदांना विमा संरक्षणासाठी अर्ज भरण्याचे आवाहन, २४ ऑगस्टपर्यंत अर्ज भरता येणार



**मुंबई** : दहीहंडी असोसिएशनने (महाराष्ट्र राज्य) आक्षेप घेतलेला असतानाही महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशनने मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व गोविंदांचा विमा उतरविण्याची मोहीम सुरू केली आहे. या संस्थेने गोविंदांना विमा संरक्षणासाठी २४ ऑगस्टपर्यंत अर्ज भरण्याचे आवाहन केले आहे. विमा संरक्षणाचा कालावधी हा १४ ऑगस्टपासून ते २८ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत आहे.

सध्या सर्वत्र दहीहंडी उत्सवाच्या अनुषंगाने मानवी मनोरे रचण्याचा सराव सुरू आहे. मात्र थर रचताना गोविंदाचा मृत्यू झाल्यास अथवा गंभीर जखमी झाल्यास संबंधित गोविंदाच्या कुटुंबियांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागते. त्यामुळे २०२३ प्रमाणे २०२४ मध्येही दहीहंडी दरम्यान मानवी मनोरे रचणाऱ्या राज्यातील ७५ हजार गोविंदांना मोफत विमा संरक्षण देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. याबाबतचा ‘शासन निर्णय’ही राज्याच्या क्रीडा विभागातर्फे २५ जुलै २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. तसेच गोविंदांपर्यंत विमा संरक्षण पोहोचवण्याची जबाबदारी ‘महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन’ या संस्थेकडे सोपविली आहे. मात्र ही संस्थेची धमार्दाय आयुक्तांकडे चुकीच्या पद्धतीने नोंदणी झाली आहे. ही शासनाची आणि गोविंदा पथकांची दिशाभूल आहे. त्यामुळे या संस्थेची नोंदणी रद्द करण्यात यावी, अशी मागणी ‘दहीहंडी असोसिएशन (महाराष्ट्र राज्य)’ या संस्थेने अलीकडेच पत्रकार परिषदेत केली. मात्र असे असतानाही महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशनने महाराष्ट्रातील सर्व गोविंदांचा विमा उतरविण्याची मोहीम हाती घेतली आहे.

मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, पालघर, कोकण, विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि राज्यातील इतर भागांतील गोविंदा पथकांनी मोफत विमा संरक्षणाच्या अधिक माहितीसाठी आणि अर्ज प्रक्रियेसंबंधित विविध शंकांसाठी महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशनचे अध्यक्ष श्रीकृष्ण पडेलकर यांच्याशी ९२२४२८५८७८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

## आजाराचे निदान आता स्वस्तात होणार, पालिकेतर्फे सुविधेचे पालक मंत्र्यांचे सूतोवाच



**मुंबई** : मुंबईत स्वाईन फ्लूसारखे आजार उद्भवलेच, तर नागरिकांना चाचण्यांचे संच, औषधे परवडणाऱ्या दरात पालिकेच्या माध्यमातून उपलब्ध केली पाहिजेत, या मागणीवर सकारात्मक विचार केला जात आहे, अशी माहिती उपनगराचे पालक मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मंगळवारी दिली. पालिकेच्या रुग्णालयांत विविध सुविधा पुरविण्यावर भर दिला आहे, असे त्यांनी पालिकेतील पत्रकार परिषदेत सांगितले. पालिकेसह अन्य रुग्णालयांत डॉक्टरांना सुरक्षा मिळावी, याबाबत योग्य ती कार्यवाही केली जात आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. पालिकेच्या नायर रुग्णालयातील तीन इमारतींमध्ये सुविधांअभावी तेथील महिला डॉक्टरांना असुरक्षित वाटत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. त्याची दखल घेत लवकरात लवकर उपाययोजना करण्याचे सूतोवाच त्यांनी केले. पालिकेच्या शहर विभागातील रस्त्यांची कामे करण्यासाठी सुमारे नऊ टक्के इतक्या अधिक दराच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत. सुमारे १५२ कोटी इतक्या अधिक खर्चाच्या या निविदांचे दर कमी करण्यासाठी पालिका कंत्राटदारांबरोबर वाटाघाटी करीत आहे. त्या अजूनही सुरूच आहेत, असे लोढा यांनी सांगितले. खड्ड्यांबाबत मुख्यमंत्र्यांकडे बैठक मुंबईत आगामी गणेशोत्सव लक्षात घेता रस्त्यांवरील खड्डे लवकर बुजविण्याची मागणी होत आहे. या कामाला लवकरच सुरुवात होणार आहे. त्यासंबंधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी बैठक बोलावली आहे, अशी माहिती लोढा यांनी दिली.

# बोगस भारतीय पासपोर्टवर सौदीला जाणाऱ्या २५ वर्षांच्या बांगलादेशी तरुणाला अटक

**मुंबई** : पुणे येथून पारपत्र मिळवून सौदी अरेबियाला जाणाऱ्या बांगलादेशी नागरिकाला इमिग्रेशन विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. आरोपी १३ वर्षांपूर्वी बांगलादेशातून बेकायदेशिररित्या भारतात आला होता. त्यानंतर तो दोन वेळा भारतीय पारपत्रावर सौदी अरेबियाला गेला होता. अखेर छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर आलेल्या उस्मान किरमत सिद्धीकी ऊर्फ मोहम्मद ओसमान किरमतअली बिस्वास याला पकडण्यात आले. बनावट कागदपत्र व पारपत्र प्रतिबंधक कायद्याअंतर्गत आरोपीविरोधात सहार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मोहम्मद ओसमान नुकताच आंतरराष्ट्रीय विमानतळावर आला होता. त्याला सौदी अरेबियाला जायचे होते. त्याच्या पारपत्राची पाहणी केल्यानंतर त्याचा जन्म कोलकाताचा असून त्याने पारपत्र पुण्यात काढल्याचे निदर्शनास आले. त्याच्या बोलीभाषेवरून तो बांगलादेशी नागरिक असल्याचा इमिग्रेशन अधिकार्यांना संशय आला होता. त्यामुळे अधिकार्यांनी त्याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आपण बांगलादेशी नागरिक असल्याची कबुली त्याने दिली. तो १३ वर्षांपूर्वी मामा बादशाह याच्यासोबत बांगलादेशातून भारतात आला होता. दोन वर्ष कोलकाता येथे मजुरीचे काम केल्यानंतर तो पुण्यात कायमचा स्थायिक झाला. तेव्हापासून तो वाकडच्या मराठी स्कूलसमोरील मिल क्रमांक ३९२ मध्ये वास्तव्यास होता. याचदरम्यान त्याने बनावट कागदपत्र बनवून २०१४ साली पुण्यातून उस्मान किरमत सिद्धीकी या नावाने भारतीय पारपत्र मिळविले होते. या पारपत्रावर जून २०१६ रोजी तो सौदी अरेबिया येथे नोकरीसाठी गेला.


सप्टेंबर २०२२ मध्ये भारतात आल्यानंतर सात महिन्यानंतर म्हणजे एप्रिल २०२३ रोजी तो पुन्हा सौदी अरेबियाला गेला. त्यानंतर तो मार्चमध्ये परत भारतात आला होता. त्याला पुन्हा सौदी अरेबियाला नोकरीसाठी जायचे होते. त्यासाठी तो शनिवारी रात्री आंतरराष्ट्रीय विमानतळावर आला होता. मात्र तो बांगलादेशी असल्याचे उघडकीस येताच त्याला पुढील चौकशीसाठी सहार पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. याप्रकरणी इमिग्रेशन अधिकारी भरत दिनकर चिंदगे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी मोहम्मद ओसमानविरुद्ध बनावट भारतीय पारपत्र बाळगून भारत झ सौदी अरेबिया दरम्यान प्रवास केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. याच गुन्ह्यांत नंतर त्याला पोलिसांनी अटक केली. आरोपी सध्या पोलीस कोठडीत आहे. आरोपीचे बांगलादेशात नियमित येणे - जाणे असल्याचा पोलिसांना संशय आहे. याबाबत सहार पोलीस अधिक तपास करीत आहेत. तसेच आरोपीला पारपत्र बनवण्यात कोणी मदत केली याचाही तपास सुरू आहे.

# स्वातंत्र्यदिनापूर्वी नाकाबंदीत सापडले दोन कोटींचे एमडी

**मुंबई** : स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमिवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये त्यासाठी ऐरोली टोलनाक्यावर करण्यात आलेल्या नाकाबंदीत दोन कोटी रुपयांचे मेफेड्रोन जप्त करण्यात आले. याप्रकरणात सराईत टोळी असल्याचा संशय आहे. नवघर पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून एकाला अटक केली असून आरोपीकडून सुमारे दोन किलो एमडी आणि मोटरगाडी जप्त करण्यात आली आहे.

१५ ऑगस्ट रोजी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी १४ ऑगस्टपासूनच मुंबईतील सुरक्षा वाढविण्यात आली आहे. या पार्श्वभूमिवर विविध ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली आहे. मुलुंड येथील एरोली नाका येथेही अशाच प्रकारे नाकाबंदी करण्यात आली होती. त्याअंतर्गत मुंबईत प्रवेश करणाऱ्या मोटरीची तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यावेळी पोलीस निरीक्षक चौहान, सहाय्यक पोलीस निरीक्षक धाडगे व पोलीस उपनिरीक्षक दणाने यांच्या पथकाने एक बलेनो मोटर अडवली. मोटरगाडीची तपासणी केली असता संशयीत भुकटी सापडली. त्यामुळे चालक मोहम्मद कलीम सलीम चौधरीला (२७) मोटरीतून खाली उतरण्यास सांगितले. त्यानंतर अमली पदार्थ चाचणी कीटच्या साह्याने तपासणी करण्यात आली असता ती पिवळसर पावडर एमडी असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर याबाबतची माहिती नवघर पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांची अतिरिक्त कुमक घटनास्थळी दाखल झाली. तपासणी केली असता आरोपीकडून दोन किलो २९ ग्रॅम एमडी सापडले. त्याची किंमत दोन कोटी दोन लाख रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली. याशिवाय गुन्ह्यात वापरण्यात आलेली बलेनो मोटरही पोलिसांनी जप्त केली. याप्रकरणी चौधरीविरोधात अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चौधरी कुर्ला येथे गाझीमिया दर्ग्याजवळ राहतो. चौधरीची चौकशी केली असता याप्रकरणात साकीब नावाच्या आरोपीचाही सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्याचा शोध सुरू आहे. आरोपीने यापूर्वीही अनेक वेळा अशा प्रकारे अमली पदार्थांची तस्करी केल्याचा संशय आहे. त्याबाबत पोलीस तपास करीत आहेत.

## विद्यार्थिनीवर ५ महिन्यांपासून होत होता बलात्कार
# तक्रारीनंतर शिक्षकाला केली अटक



**मुंबई** : नालासोपारा पूर्वेच्या संतोष भवन परिसरामध्ये एका १४ वर्षीय विद्यार्थिनीवर तिच्या शाळेत शिकवणाऱ्या शिक्षकाने अनेक वेळा बलात्कार केल्याची धक्कादायक समोर आली आहे. अमित दुबे असे या नराधम आरोपीचे नाव असून तो ३० वर्षांचा आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. या प्रकरणी विद्यार्थिनीच्या तक्रारीवरून आरोपी अमित दुबेविरोधात पेल्हार पोलीस ठाण्यात बलात्कार आणि पोक्सो कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तसेच त्याला अटक केली असल्याची माहिती पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी दिली आहे. ३० वर्षीय नराधम आरोपी अमित दुबे हा नालासोपारा पूर्वेच्या संतोषभुवन येथील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षक आहे. तो वलईपाडा येथे उज्वल नावाची खासगी शिकवणीदेखील घेत होता. त्याच्या शाळेत शिकणाऱ्या एका १४ वर्षीय विद्यार्थिनीवर त्याने शिकवणीमध्ये शिकवण्याच्या बहाण्याने बोलवून तिच्यावर बलात्कार केला, तसेच या घटनेबद्दल कोणालाही सांगू नकोस, अशी धमकी दिली. यानंतर आरोपीने वारंवार पिडीतेला धमकावून तिच्यावर शाळेत आणि शिकवणी वर्गात बलात्कार करत होता. मार्च महिन्यापासून ते जुलैपर्यंत असे तब्बल ५ महिने या नराधमाने विद्याथीनींवर बलात्कार केल्याचा आरोप पिडीतीने केला आहे. अखेर या पिडीतेला वारंवार होणारा अत्याचार सहन न झाल्याने तिने आपल्या आईकडे घडलेला सगळा प्रकार सांगितला. त्यानंतर तिच्या कुटुंबीयांनी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

# शिक्षिकेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्याला अटक

**मुंबई** : आपल्याच प्रेयसीवर लैंगिक अत्याचार करण्याच्या गुन्ह्यात हसन सय्यद नामक प्रियकराला साकीनाका पोलिसांनी अटक केली. लग्नाच्या आमिषाने त्याने पीडित तरुणीवर जबदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप असून याच गुन्ह्यात त्याला अंधेरीतील स्थानिक न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे.

शिक्षिका असलेली ही पीडित तरुणी साकीनाका येथे राहते. सहा वर्षांपूर्वी तिची हसनसोबत ओळख झाली. हसन याच परिसरात राहत असून तो टेलर आहे. मैत्रीनंतर त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले. मात्र काही महिन्यानंतर त्याने दुर्सया तरुणीशी लग्न केले. ही माहिती समजल्यानंतर संबंधित शिक्षिकेने त्याच्याशी संबंध तोडले. त्यानंतर तीन वर्षांनी ते दोघेही भांडुप येथे भेटले होते. यावेळी त्याने तिच्यावर प्रेम असल्याचे सांगून त्याच्या पत्नीला घटस्फोट देऊन तिच्याशी लग्न करणार असल्याचे सांगितले होते. त्याच्याावर विश्वास ठेवून तिने त्याच्याशी पुन्हा बोलायला सुरुवात केली. याच दरम्यान त्याने तिला साकीनाका येथील एका हॉटेलमध्ये आणले होते. तिथे त्याने तिच्यावर तीन ते चार वेळा जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. तो तिच्याशी लग्न करणार असल्याने तिने त्याला विरोधही केला नाही.

जून २०२४ रोजी तिने त्याला लग्नाविषयी विचारणा केल्यानंतर त्याने त्याच्या पत्नीला घटस्फोट देण्यास तसेच तिच्याशी लग्न करण्यास नकार दिला. इतकेच नव्हे तर तिच्याशी काहीही संबंध ठेवायचे नाही, असे सांगितले. या प्रकाराने तिला प्रचंड मानसिक धक्का बसला. त्यामुळे तिने त्याच्याविरुद्ध साकीनाका पोलिसात तक्रार केली होती. या तक्रारीनंतर सोमवार, १२ ऑगस्टला हसनविरुद्ध पोलिसांनी फसवणुकीसह लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल होताच त्याला पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर त्याला मंगळवारी दुपारी अंधेरीतील स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली आहे.

# शेअर्स बाजारात फायद्याचे आमिष दाखवून दोन कोटींची फसवणूक

**अंबरनाथ** : अंबरनाथ पश्चिम येथील वुलन चाळीत राहणारे नजीर चांदसाब खान यांना दोन कंपनीच्या संचालकांनी शेअर्स बाजारात इंस्टिस्ट्युशनल ट्रेडींग केल्यास जास्तीचा परतावा मिळणार असे अमिष दाखवून खान यांच्या बॅंक खात्यावरुन २ कोटी ५१ लाख ३६ हजार ५०० रुपये ऑनलाईन काढून फसवणुक केल्याप्रकरणी अंबरनाथ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंबरनाथ पश्चिम येथील उलन चाळीत राहणारे नजीर चांदसाब खान यांना स्टेट स्ट्रीट वीआयपी या कंपनीचे सहायक केरी गोरमली, जॉन ठक्कर आणि मारवाडी सिक्युरिटी फायनांशिय लिमिटेड कंपनीचे शिवांगी अगरवाल आणि शेअर्स खान मास्कम या कंपनीचे ॲडबीन बार्ट टॉमर यांनी आपल्या मोबाईल आणि ॲपवरुन शेअर्स बाजारात इंस्टीट्युशनल ट्रेडींग केल्यास जास्तीचा नफा मिळणार असे अमिष दाखवले. दरम्यान खान हे यांच्या अमिषाला बळी पडले. आरोपी यांनी पाठवलेल्या बॅंक खात्यावर नजीर खान यांच्या बॅंक खात्यातून २ कोटी ५१ लाख ३६ हजार ५०० रुपये ऑन लाईन इलेक्ट्रीकल माध्यमातून पैसे ट्रांसफर करुन फसवणूक केली. या प्रकरणी अंबरनाथ पोलिस ठाण्यात नजीर खान यांच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगन्नाथ कळसकर करत आहेत.

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
३
मुंबई, मंगळवार, २० ऑगस्ट ते २६ ऑगस्ट २०२४

# संपादकीय

## मुली, तू जन्मूच नकोस...



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

गेली आहे, तिच्यावर लादलेल्या बेड्या फेकून देते आहे. अडथळ्यांवर मात करते आहे. लिंग, जात, वर्ग या सगळ्याच ठिकाणच्या पुरुषी मक्तेदारीला तिने आव्हान दिले आहे. ते थोपवण्यासाठी, संपवण्यासाठी बलात्कार, क्रौर्य याशिवाय दुसरे कुठले मार्ग पुरुषाकडे असू शकतात? काही वर्षांपूर्वी झालेल्या एका पाहणीमध्ये ‘तुम्हाला सगळ्यात जास्त भीती कशाची वाटते,’ असा प्रश्न स्त्रियांना विचारला गेला होता, तेव्हा बहुतांश स्त्रियांनी ‘बलात्काराची’ असे उत्तर दिले होते. म्हणजे जिवाच्या भीतीपेक्षाही त्यांना बलात्काराची




बलात्कार आणि क्रूर हत्या यांची बळी ठरलेल्या कोलकात्यातील डॉक्टर तरुणीपेक्षा आईच्या गर्भातच स्त्रीभ्रूणहत्येला सामोऱ्या जाणाऱ्या मुली किती तरी नशीबवान म्हणायच्या. होयङ्क मुली, स्त्रिया यांच्या बाबतीत घडणाऱ्या क्रौयार्ची प्रतवारी करायची तर ती अशीच करावी लागेल. या जगात येऊन कुणाची तरी लाडकी लेक, लाडकी बहीण, लाडकी नात, पुतणी, भाची, मैत्रीण, बायको होऊनही कुणा वासनांधाच्या विकृतीची शिकार होण्यापेक्षा जन्मण्याच्या आधीच काय तो मृत्यू आलेला कधीही चांगला. काळजाचा तुकडा असलेल्या लेकीला प्रेमाने, लाडाकोडात वाढवण्याची, शिकवण्याची, हवे ते सगळे मिळवून देण्याची इच्छा बाळगणाऱ्या आईबापांना एके काळी हुंडा नावाच्या छुप्या, पण भयंकर राक्षसाची दहशत होती. आजघडीला त्याची जागा बलात्कार या महाभयंकर अशा सैतानाने घेतली आहे. जळी स्थळी काष्ठी पाषाणी त्याची भीती बाळगत जगण्यापेक्षा ह्यपापा की परीङ्क जन्माला न आलेलीच बरी, असे कोणत्याही आईबापांना आजघडीला वाटत असेल तर त्यात काय चुकीचे आहे?

कोलकात्यातील डॉक्टर तरुणीच्या निर्घृण हत्येनंतर देशभर निर्माण झालेला रोष याच सगळ्या पालकांचे प्रतिनिधित्व करतो. दिल्ली असो, हैदराबाद असो, कोलकाता असो की उत्तराखंडङ्क कोणत्याही कारणाने घराबाहेर पडणारी स्त्री पुरुषांच्या विकृत क्रौयार्ला सातत्याने बळी पडत असेल तर आपण खरोखर २१ व्या शतकात जगत आहोत का? किती वेळा या सगळ्याचा संताप व्यक्त करण्यासाठी लोकांनी रस्त्यावर उतरायचे? दर काही काळाने कुठे तरी पुन्हा अशी घटना घडली की चीड, उद्विग्नता, हताशा घेऊन मोर्चे काढायचे आणि तिच्या जागी आपली लेक नव्हती याचे समाधान मानायचे?बलात्कार, क्रूर हत्या हा गेली काही वर्षे सातत्याने घडणाऱ्या गुन्ह्यांच्या संदर्भातला भावनिक पसारा बाजूला ठेवला की उरते ते एकच सत्य, ते म्हणजे व्यवस्था. या सगळ्याला जबाबदार आहे ती पुरुषप्रधान व्यवस्था. स्त्रीच्या विरोधातला हा अतिशय किळसवाणा, नीच, घृणास्पद, क्रूर अत्याचार पुरुषाच्या मनातली तिची जागा तिला दाखवून देण्यासाठी, काहीही झाले तरी सामाजिक सत्तेच्या उतरंडीत मी तुज्याहून श्रेष्ठच आहे, हे दाखवून देण्यासाठीच असतो. ज्या क्षणी एखादी स्त्री हवीशी होते, त्या क्षणी ती उपलब्ध असणे, नसेल तर काहीही करून ती मिळवणे आणि तिचा नकार असेल तर तिला जन्माचा धडा शिकवणे... त्यासाठी क्रौयार्चे टोक गाठावे लागले तरी बेहत्तर. स्त्री-पुरुषांच्या नात्यातील सत्तासमतोल हा असा आहे. खरे तर तो समतोल नाहीच. तू स्त्रीपेक्षा श्रेष्ठ आहेस, ही भावना पुरुषांच्या मनात आपल्याच नाही तर जगातील बहुतेक सामाजिक व्यवस्थांमध्ये अगदी लहानपणापासून बिंबवली जाते. ती घेऊनच ते वाढतात. शिक्षण, घरातील वातावरण, स्त्रीवादी विचार, संबंधित व्यक्तीची संवेदनशीलता या सगळ्याच्या परिणामी काही थोडके पुरुष या सगळ्यापासून वाचून अपवाद ठरतात खरे, पण बाकी अनेक जण हिंमत नसते म्हणून किंवा संधी मिळत नाही म्हणून साळसूद वावरत राहतात. घरी मारहाण करणे, रस्त्यावर छेड काढणे, अश्लील बोलणे, अश्लील क्लिप्स पाठवणे, अंगचटीला जाणे असे ‘पुरुषार्थ’ या सगळ्यातूनच येतात.

‘आंदोलनामागे राजकीय षडयंत्र’; तृणमूलमधील काही आरोप; काहींचा आंदोलनाला पाठिंबा

हजारो वर्षे जिला घरात डांबून ठेवले, चूल आणि मूल एवढेच करायला लावले ती स्त्री आधुनिकतेच्या रेट्यात व्यक्ती म्हणून विकसित होत जास्त भीती वाटत होती. त्यामुळेच एकीवर बलात्कार झाला की शंभर मुलींचा अवकाश सीमित होत जातो. त्यांच्या मोकळेपणाने वागणे बोलणे, वावरणे, उशिरापर्यंत बाहेर असणे यासह अनेक गोष्टींवर बंधने येतात. बलात्कार झाला की पुढचे सगळे आयुष्य ‘बरबाद’ होते, अशा कल्पना बिंबवल्या जातात. तिची बेअब्रू होऊ नये म्हणून तिची ओळख लपवली जाते. पण हे सगळे अशाच पद्धतीने का करत राहायचे? मुळात स्त्रीची अब्रू हे कुठले काचेचे भांडे नाही, बलात्कार हा त्या व्यक्तीविरोधातील व्यक्तिगत गुन्हा नाही, तर तो पुरुषसत्ताक मानसिकतेने केलेला ‘राजकीय’ गुन्हा आहे, हे आपण जोपर्यंत नीट समजून घेत नाही, मुलींच्या मनांवर बिंबवत नाही, तोपर्यंत परिस्थिती बदलण्याची शक्यता खूपच कमी आहे.

आपल्या राजकारण्यांकडे ही परिपक्वता नाही, हे तर उघडच आहे. अन्यथा काही वर्षांपूर्वी घडले ते हैदराबादमधील बलात्काऱ्याचे ‘एन्काउंटर’ घडते ना. बलात्काऱ्यांना ताबडतोब फाशीच द्या, ही मागणी सामान्यांकडून अत्यंत त्वेषाने होणे, हे समजण्यासारखे आहे. पण ममता बॅनर्जीसारख्या कसलेल्या राजकीय नेत्याही निव्वळ आपल्या राजकारणासाठी केंद्रीय अन्वेषण विभागाला कोलकात्यातील बलात्कार हत्याप्रकरणी रविवारपर्यंत फाशीच्या शिक्षेचा निवार्णीचा इशारा देतात, तेव्हा सगळेच हास्यास्पद होऊन जाते. हजारो वर्षे घडत- बिघडत आलेली मानसिकता झट की पट फाशी या न्यायाने कशी सुधारणार आहे? उलट त्यामुळे ती आणखीच बिघडेल असे काहीसे चित्र निर्भया कायद्यातून दिसून आले आहे. १९७५ मधले मथुरा बलात्कार प्रकरण ते २०१२ चे दिल्लीतील निर्भया प्रकरण या ३५-३७ वर्षांच्या काळात बलात्कारविरोधी कायद्यासंदर्भात बऱ्याच घडामोडी घडत गेल्या आहेत. निर्भया प्रकरणानंतर या गुन्ह्यासाठी फाशीची तरतूद करण्यात आली तेव्हा यामुळे बलात्कारितांच्या हत्यांचे प्रमाण वाढेल, असेही म्हटले गेले होते. ते काही प्रमाणात खरे होताना दिसत आहे.कोलकाता प्रकरणातील तपशील जसजसे पुढे येत आहेत, तसतसे त्यातील अनेक गोष्टी सगळ्यांनाच कमालीच्या अस्वस्थ करणाऱ्या आहेत. बलात्कारानंतर संबंधित डॉक्टर तरुणीच्या बाबतीत जे क्रौर्यकर्म केले गेले, तिच्या शरीराची ज्या पद्धतीने विटंबना करण्यात आली, ते हिणकस म्हणण्याच्याही पलीकडचे आहे. माणूस माणसाशी असा वागू शकतो? संबंधित आरोपी पोलीस मित्र असल्याचे सांगितले जात आहे. पोलीस आणि गुन्हेगार यांच्यामधली सीमारेषा अत्यंत पुसट असल्याचे सांगितले जाते, ते या प्रकरणातून पुन्हा एकदा खरे ठरताना दिसते आहे. इतक्या मोठ्या रुग्णालयाच्या सेमिनार हॉलमध्ये सीसीटीव्ही नव्हता, हे आणखी एक विशेष. रुग्णालयाने सुरुवातीला या प्रकरणाची आत्महत्या म्हणून बोळवण करायचा प्रयत्न केला, हेदेखील आपल्याकडे नेहमी घडते त्या प्रकारामधलेच. आणि या सगळ्यामुळे रुग्णालयावर हल्ला करणाऱ्या जमावाने येऊन रुग्णालयाची अपरिमित मोडतोड, हानी केली हेदेखील आपल्या एकूण मानसिकतेला धरून असणारेच. फक्त कुठल्या सर्वसामान्य माणसाची समूहाबरोबर जाऊन असे काही करायची हिंमत होऊ शकते, हा प्रश्न विचारला की त्याची उत्तरे वेगळी मिळतात. दिल्लीतील तरुणीला निर्भया म्हटले गेले होते, तसे आता या तरुणीला अभया म्हटले जात आहे. पण अभया असो की निर्भया, घरीदारी, कामाच्या ठिकाणी कुणीच, कुठेच सुरक्षित नाही. अशा असुरक्षित जगात पोरी तू जन्मूच नकोस, हेच बरे.

# ‘घर में घुसके’...



ज्या सहजतेने रशियाच्या हद्दीत कित्येक किलोमीटर आत युक्रेनच्या फौजा जाऊ शकल्या, ते पाहता अशा आणखीही कारवाया घडू शकतात.. एखाद्या युरोपीय देशाने दुसऱ्या युरोपीय देशावर हल्ला करण्याची दुसऱ्या महायुद्धानंतरची पहिली घटना २४ फेब्रुवारी २०२२ रोजी घडली. त्या दिवशी रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेपायी त्या देशाने शेजारील युक्रेनमध्ये फौजा धाडल्या. त्याच रशियावर आता नाझी आक्रमणानंतर प्रथमच युक्रेनच्या रूपात एखाद्या देशाने हल्ला केला आहे. युक्रेनचा हा हल्ला खऱ्या अथार्ने ‘बचावात्मक प्रतिहल्ला’ आहे. वास्तविक याच स्वरूपाचा दावा पुतिन यांनी रशियन हल्ल्याच्या समर्थनार्थ केला होता. त्यांच्या दृष्टीने युक्रेनच्या आग्नेयेकडील डॉनेत्स्क आणि लुहान्स्क हे रशियाचेच भूभाग आहेत आणि युक्रेनच्या समावेशातून ‘नाटो’ देशांचा विस्तार रोखण्यासाठी बचावात्मक कारवाई आवश्यक होती. त्या वेळी या कारवाईचे समर्थन कोणत्याही लोकशाहीप्रेमी देशाने केले नव्हते. पण युक्रेनच्या बाबतीत मात्र असे घडणार नाही. बहुतेक देश ताज्या युक्रेनी प्रतिहल्ल्याचे समर्थनच करतील. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी नाझी भस्मासुराला रोखायचे कसे यावर दोस्तराष्ट्रांमध्ये खल सुरू होता. त्या वेळी ‘आपणही नाझी जर्मनीवर हल्ले करावे’ या व्यूहरचनेवर कालौघात मतैक्य झाले आणि नाझी विस्तारवाद रोखण्याच्या प्रयत्नांना निर्णायक कलाटणी मिळाली. परंतु त्या वेळी दोस्तराष्ट्रांची एक फळी होती आणि त्यांची एकत्रित ताकद जर्मनीपेक्षा अधिक होती. युक्रेनच्या बाबतीत तशी परिस्थिती नाही. युक्रेनच्या तिप्पट-चौपट सैन्य आणि सामग्री रशियाकडे आहे. तरीदेखील थेट रशियाच्या हद्दीत घुसून तेथील भूभाग ताब्याखाली आणण्याचे धोरण युक्रेनने गेल्या आठवड्यात अंगीकारले. त्या देशाचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्या धैयार्ला याबद्दल दाद द्यावी लागेल. युक्रेनच्या या अनपेक्षित हल्ल्याविषयी रशियन फौजा, पुतिन सरकार आणि रशियाच्या सुपरिचित गुप्तहेर यंत्रणेला कोणतीही खबर नसावी हे युक्रेनचे पहिले यश. सहा ऑगस्ट रोजी सुरू झालेल्या कारवाईला थोपवणे रशियाला अजूनही शक्य झालेले नाही. उलट ज्या ठिकाणी युक्रेनचा हल्ला झाला, त्या आणि आजूबाजूच्या प्रदेशांमधून नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यासाठी रशियन प्रशासनाची धावपळ सुरू आहे. किमान दोन प्रांतांमध्ये आणीबाणी जाहीर झाली. हे युक्रेनचे दुसरे यश. पण ही यशोमालिका आणखी किती किलोमीटर आणि किती दिवस सुरू राहणार, यावर कदाचित युद्धाची आगामी दिशाही ठरू शकेल.

या प्रतिहल्ल्याचे वर्णन शूर, धाडसी, देदीप्यमान वगैरे बिरुदांनी होत असले, तरी तो प्रत्यक्षात अगतिकतेतून झालेला आहे हे वास्तव विस्मरणात जाऊ नये. युक्रेनचा १८ टक्के भूभाग सध्या रशियन आक्रमकांनी व्यापला आहे. यात दहा वर्षांपूर्वी ताब्यात घेतलेल्या क्रायमिया प्रांताचाही समावेश आहे. क्रायमियाचा घास रशियाने विनासायास घेतला, त्या वेळी युक्रेनचे मित्र म्हणवणारे पाश्चिमात्य देश बहुतांश गप्पच बसले. अमेरिकेने फार तर रशियावर निर्बंध लादले आणि निषेध व्यक्त केला. या अनास्थेतून बोध घेऊन, दुसऱ्यांदा रशियाचे आक्रमण झाले त्या वेळी मात्र युक्रेन पाश्चिमात्य मित्रांच्या साहाय्यासाठी वाट बघत बसला नाही. झेलेन्स्की यांनी रशियाला कडवा प्रतिकार केला. दोन्ही देशांतील सैनिकी संख्याबळाची तफावत पाहता युक्रेन फार तर सहा महिने टिकाव धरू शकेल असाच बहुतेक विश्लेषकांचा होरा होता. तसे काही घडले नाही. युक्रेनने चिवट प्रतिकार केला आणि अद्यापही करतो आहे. बराचसा स्वतःच्या हिकमतीवर आणि काही प्रमाणात अमेरिकादी पाश्चिमात्य मित्रांच्या मदतीवर. परंतु हा आवेश किती काळ टिकेल यास मयार्दा आहेत. अनेकविध निर्बंध लादले गेले आणि या युद्धात अपरिमित हानी झाली तरी रशियाची अर्थव्यवस्था आजही बऱ्यापैकी सुस्थितीत आहे. कारण रशियाचा अनेक देशांशी व्यापार सुरू आहे. भारत हा रशियन खनिज तेलाचा सर्वांत मोठा खरेदीदार आहेच. त्याहीपेक्षा चीन, उत्तर कोरिया आणि इराणकडून दारूगोळा आणि इतर सामग्री रशियाला मिळत आहे. शिवाय युद्धातील मनुष्यहानीविषयी या देशाने नेहमीच ऐतिहासिक असंवेदनशीलता आणि अनास्था दाखवलेली आहे. त्यामुळे असल्या युद्धांमध्ये रक्तबंबाळ होऊन शस्त्रे खाली ठेवण्याची या देशाची परंपरा नाही.

युक्रेनचे तसे नाही. दररोज या देशामध्ये मनुष्यहानीचा झ्र रणांगणावर आणि शहरांमध्ये होणाऱ्या हल्ल्यांमुळे झ्र हिशेब मांडावा लागतो. युक्रेनची अर्थव्यवस्था डबघाईला गेलेली असून, पाश्चिमात्य देशांच्या मदतीवर तगून आहे. त्यात पुन्हा अमेरिकेसारख्या देशामध्ये सत्तांतर झाल्यास आणि ‘त्यांचे त्यांनी बघून घ्यावे, आम्ही मदतीस बांधील नाही’ या विचारांचे डोनाल्ड ट्रम्प महोदय अध्यक्षपदी विराजमान झाल्यास तेथून मदतीचा ओघ थांबणार हे नक्की. युरोपमध्येही काही देशांत पुतिन समर्थक सरकारे आहेत आणि युरोपीय समुदाय किंवा नाटो या संघटनांच्या छत्राखाली राहूनही युक्रेनला मदत पुरवण्याबाबत ही सरकारे नाराजी व्यक्त करतात. युक्रेनला अधिक विध्वंसक आणि लांब पल्ल्याची शस्त्रास्त्रे देण्याची इच्छा असूनही अमेरिका किंवा जर्मनीला ती देता येत नाहीत. कारण यास या दोन्ही देशांचा युद्धातील थेट सहभाग मानून अधिक तीव्रतेने हल्ले करण्याची किंवा युद्धाची व्याप्ती वाढवण्याची धमकी पुतिन यांनी पूर्वीच दिली आहे. अशा वेळी ‘जैसे थे’ परिस्थतीत लढत राहणे इतकेच झेलेन्स्की यांच्याहाती उरते. पण ‘जैसे थे’ म्हणजे युक्रेनसाठी धिम्या मृत्यूस सामोरे जाण्यासारखे. तेव्हा काही करणे आवश्यक होते.

यातूनच युक्रेनच्या ईशान्येकडील कुर्स्क या रशियन प्रांतामध्ये शिरण्याची योजना आकारास आली. कुर्स्क प्रांतामध्ये जवळपास एक हजार चौरस किलोमीटरचा भूभाग युक्रेनच्या ताब्यात आल्याचा दावा त्या देशाचे लष्करी कमांडर करत आहेत. रशियाने त्या भागातून ७६ हजार नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले आहे. विशेष म्हणजे या हल्ल्याविषयी पुतिन केवळ चरफड व्यक्त करत आहेत आणि युक्रेनच्या पाश्चिमात्य मित्रदेशांवर आगपाखड करत आहेत. म्हणजे या हल्ल्यामुळे तेही चकित झाले हे उघड आहे. हल्ल्यामागे युक्रेनचे दोन हेतू असल्याचे बोलले जाते. युक्रेनच्या पूर्वेस रशियाच्या सैन्याची जमवाजमव मोठी आहे. तेथून काही फौजा कुर्स्कच्या रक्षणासाठी पाठवल्या जातील आणि रशियाचा डॉनेत्स्कसारख्या प्रांतांमधील दबाव कमी होईल, हा पहिला हेतू. कुर्स्कमध्ये रशियाचे अनेक सैनिक व नागरिक युक्रेनच्या ताब्यात आले आहेत. त्यांना ओलीस ठेवून रशियाशी युक्रेनच्या युद्धकैद्यांच्या मुक्ततेविषयी वाटाघाटी आरंभणे हा दुसरा हेतू. याशिवाय कुर्स्कला लागून असलेल्या सीमेवर एक प्रकारे ‘बफर’ क्षेत्र निर्माण करणे हाही एक दीर्घकालीन हेतू. याचा दृश्य परिणाम म्हणजे रशियाने डॉनेत्स्कमधून कुर्स्ककडे काही कुमक रवाना करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, युक्रेनला अपेक्षित आहे त्यानुसार डॉनेत्स्कमधील रशियाची फळी अद्याप कमकुवत वगैरे झालेली नाही. तरीही कुर्स्क हल्ल्याच्या निमित्ताने पुन्हा एकदा रशियाचे युद्धनैपुण्य आणि युद्धसिद्धतेतल्या मयार्दा उघड झाल्या. ज्या सहजतेने रशियाच्या हद्दीत कित्येक किलोमीटर आत युक्रेनच्या फौजा जाऊ शकल्या, ते पाहता युक्रेन आणखी काही आघाड्यांवर अशा कारवाया करू शकतो. आज हे युद्ध युक्रेनने अनपेक्षितपणे रशियन भूमीवर वळवले आहे. या परिस्थितीत सुरुवातीस बावचळलेला रशिया सावरल्यानंतर काय करतो, यावर पुढील युद्धाची दिशा ठरू शकते. शत्रू आपल्याही भूमीत धडकू शकतो ही जाणीव इतर कोणत्याही देशाप्रमाणे रशियालाही अस्वस्थ करणारी ठरणार. या हल्ल्याद्वारे युक्रेनने त्याच्या मित्रदेशांनाही संदेश दिला आहे. आमच्याकडे क्षमता नसूनही इच्छाशक्ती आहे. तुमच्याकडे क्षमता आहे, तर इच्छाशक्तीही दाखवावी हा तो संदेश. यातून संबंधित देश काय बोध घेतील तो घेतील. पण युक्रेनचा इरादा स्पष्ट आहे. त्यामुळेच शत्रू अशक्त नाही, तो आपल्यापेक्षा बलवान आहे, हे दिसत असूनही ‘घर में घुसके मारेंगे’ ही रणनीती स्वच्छपणे कृतीत उतरवणाऱ्या युक्रेनची दखल क्रमप्राप्त.

# स्वातंत्र्य... आपले आणि त्यांचे!



सध्याच्या घडीला पाकिस्तान, मालदीव, नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका या आपल्या सगळ्याच शेजारी देशांमध्ये एक प्रकारचे अस्थैर्य आहे. त्यात चीनची छाया आहेच. दक्षिण आशियात भारताखालोखाल स्थिर आणि परिपक्व लोकशाही म्हणून ज्या देशाचा उल्लेख करता आला असता, त्या बांगलादेशच्या पंतप्रधानांनाच गत सप्ताहात देशांतर्गत उठावामुळे भारतात पळ काढावा लागला. बांगलादेशच्या पदच्युत पंतप्रधान शेख हसीना सध्या भारतात आश्रयाला आहेत. त्या देशात नागरिकांनी - विशेषतः विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त उठाव करून तीन सलग कार्यकाळ उपभोगणाऱ्या सरकारला जेरीस आणले. बांगलादेशात यापूवीर्ही उठावामुळे सत्ताधीशांना पदत्याग करावा लागला किंवा त्यांची हत्या झाली. पण ते उठाव लष्करशहा किंवा राजकीय विरोधकांनी केले होते. इथे प्रक्षुब्ध जनतेनेच शेख हसीनांना देशाबाहेर हाकलून दिले. हंगामी सरकार स्थापले जाऊनही बांगलादेश धुमसत आहे. हसीना यांच्या सुपरिचित भारतमैत्रीचा राग तेथील हिंदूंवर काढला जात आहे. त्यातून तो देश सोडून भारतात पळून जाण्याची निकड यांपैकी बहुतांना वाटली, तर पुन्हा एकदा निर्वासित लोंढ्याचा पेचप्रसंग भारतासमोर उभा राहू शकतो. हंगामी बांगलादेशी सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनुस यांनी परवा हिंदू मंदिरांना भेटी देऊन तेथील मुख्य अल्पसंख्याकांना धीर देण्याचा प्रयत्न केला. त्यातून परिस्थिती निवळली तर ठीक. पण ती शक्यता कमी. कारण भारतात आश्रयाला असलेल्या शेख हसीनांविरोधात आंदोलकांना खटला चालवायचा आहे. त्यांच्यावर खुनाचे आरोप ठेवण्यात आले आहेत. हसीनांच्या सरकारने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आंदोलकांचे बळी घेतले असतील, तर त्याच कायद्याची अग्निपरीक्षा त्यांनाही द्यावी लागणार. त्यास हसीना यांची तयारी नाही हे तर उघडच आहे. शेख हसीना यांसारख्या ७६ वर्षीय वृद्धेस कदाचित मृत्युदंड होणारही नाही. पण देशातून पलायन करून त्यांनी कायदेशीर बचावाची संधी गमावली खास. कायद्याचा वरवंटा अनिर्बंधपणे चालवला, तर कधीतरी तोच आपल्यावरही चालवला जाऊ शकतो ही बाब हसीनांसारख्या जुन्याजाणत्या नेत्यांनाही समजू नये ही आपल्या बहुतेक शेजारी देशांची शोकांतिका आहे. त्यामुळे मागे श्रीलंकेत झाले त्याप्रमाणे जनताच अनिर्बंध बनली आणि श्रीलंकेप्रमाणेच बांगलादेशातही राष्ट्रप्रमुखांच्या अधिकृत निवासस्थानावर चाल करून गेली. भारताच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त या अस्वस्थ, अस्थिर शेजाराची नोंद घेणे त्यामुळे समयोचित ठरते. बांगलादेशचे अशा प्रकारे विस्कटणे हे भारताच्या परराष्ट्र धोरणासाठी धक्कादायक ठरले. कारण दक्षिण आशियामध्ये भूतान वगळता बांगलादेशच भारताचा दीर्घकालीन आणि घनिष्ठ सहकारी ठरला होता. इतरांबाबत तसे म्हणता येत नाही. पाकिस्तानने १४ ऑगस्टला स्वातंत्र्य दिन साजरा केला, परंतु तेथील बहुतेक जनता अनेक प्रकारच्या स्वातंत्र्यांपासून आजही मुखरलेली आहे. पाकिस्तानचा ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता खेळाडू अर्शद नदीमची तेथील सरकारकडून प्रधान अपेक्षा काय, तर गावात पक्का रस्ता आणि गॅस सिलिंडरचा सुरळीत पुरवठा! ६० वर्षांपूर्वी, ३० वर्षांपूवीर्ही हीच अपेक्षा असणार आणि आजही तीच! म्हणजे काळाच्या ओघात हा देश पुढे सरकलेलाच नाही. हे सरकणे देशाच्या शस्त्रभांडारात अण्वस्त्रे किती या निकषावर ठरत नसते. तर दारिद्र्यरेषेच्यावर किती जनता आली, साक्षरतेचा आकडा किती पुढे गेला, बालविवाहाचे नि बालमृत्यूचे प्रमाण किती घटले, कुपोषण नि भूकमृत्यूच्या घटना किती दुर्मीळ झाल्या, संघटित रोजगारात महिलांचा टक्का किती वाढला या निकषांवर एखादा देश किती पुढे सरकला हे ठरत असते. जोवर हे होत नाही, तोवर प्रगतीचे उपरोल्लेखित प्राथमिक निकषही बदलणार नाहीत. हे सगळे साधून येण्यासाठी सर्वाधिक महत्त्वाची असते, ती सशक्त लोकशाही. तीच आपल्या सर्व शेजाऱ्यांमध्ये ठिसूळ आहे. त्यामुळे राजकीय, धार्मिक ठसठस नित्याचीच. ती अनेकदा फसफसून वर येते. पाकिस्तानमध्ये आजही राजकीय पक्षांचे भवितव्य तेथील जनता नाही तर पाकिस्तानी लष्कर ठरवते. एखाद्या पक्षाला जिंकून आणायचे लष्कराने ठरवल्यानंतर मतपेटीतून त्या पक्षाला मते मिळत नसतील, तर निकालात फेरफार केला जातो आणि अपेक्षित सरकार सत्तास्थानी बसवले जाते. गेल्या सलग दोन निवडणुकांमध्ये हे दिसून आले. तेथील दोन्ही प्रमुख आणि जुने पक्ष नखशिखान्त सरंजामी प्रवृत्तीचे आहेत. तर ज्या नवथर पक्षाविषयी जनतेने विश्वास दाखवला, त्या पक्षाच्या प्रमुखांना अजूनही क्रिकेटचे मैदान आणि राजकीय मैदानातला फरक कळलेला नाही, अशी स्थिती! आता त्या पक्षावरच बंदी घालण्याचा वेडगळ प्रयत्न तेथे सुरू आहे. पूर्वी तेथे लष्कराची पकड मजबूत होती, तीदेखील आता राहिलेली नाही. आयएसआय या गुप्तचर संघटनेच्या माजी प्रमुखाला तेथे नुकतीच अटक झाली. याचे कारण लष्करामध्येही फूट पडत चालली आहे. या शेजाऱ्यापलीकडे असलेल्या अफगाणिस्तानविषयी तर न बोललेलेच बरे. आजच्याच दिवशी तीन वर्षांपूर्वी तालिबानने दुसऱ्यांदा अफगाणिस्तानमध्ये सत्ता स्थापन केली. या राजवटीला अजूनही जगातील बहुतेक सरकारांची मान्यता नाही. अल्पसंख्याकांचा संहार आणि महिलांना मिळणारी अमानुष वागणूक ही त्या राजवटीची ठळक वैशिष्ट्ये आजही कायम आहेत. पूर आणि अन्नधान्य टंचाईमुळे त्या देशात दरम्यानच्या काळात लाखोंनी बळी पडले. तालिबानच्या दडपशाहीचा अनुभव दुसऱ्यांदा घेण्याची भारताची इच्छा नाही. त्यामुळे भारताचे तेथील अस्तित्व बऱ्यापैकी मर्यादित आहे. पण ही राजवट तेथे आणखी काळ राहणार हे निश्चित. अफगाणिस्तान, मालदीव आणि बांगलादेशमध्ये बदलणारी परिस्थिती जोखण्यात आपण कमी पडलो. अशी चूक जगात अनेक देशांकडून घडत असते. पण इतक्या संख्येने हे देश आपल्याच शेजारी-पाजारी असल्यामुळे चुकांची थेट झळ आपल्याला पोहोचते हे मात्र कटू सत्य. त्यामुळे आपण त्याविषयी अधिक जागरूक असायला हवे होते. आपले अत्यंत कुशाग्र नि चाणाक्ष राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार या देशांमध्ये ढवळत आणि बिघडत चाललेल्या परिस्थितीविषयी इतके अनभिज्ञ कसे राहिले, याविषयी विरोधकांनी प्रश्न उपस्थित केले पाहिजेत. अमेरिकेच्या अध्यक्षांना अफगाणिस्तान-इराकमधील स्थितीविषयी जाण नसणे आणि इथल्यांना आपल्या शेजारी देशांमध्ये काय शिजत आहे याचा वास न येणे या भिन्न बाबी आहेत. अशा चुका येथून पुढे फार परवडण्यासारख्या नाहीत. नवीन दशकात सुरुवातीपासूनच दक्षिण आशियातील बहुतेक देशांमध्ये अस्वस्थता आणि अस्थैर्य दिसून येत आहे. २०२१ मध्ये म्यानमारमध्ये झालेले लष्करी बंड, दोन वर्षांपूर्वी श्रीलंकेत तत्कालीन अध्यक्ष गोतबाया राजपक्षे यांच्याविरोधात झालेले जनतेचे बंड, नेपाळमध्ये पाच वर्षांत पाचव्यांदा पंतप्रधान बदलण्याची वेळ येणे हे सगळे घडतच आहे. सध्याच्या घडीला मालदीव, नेपाळ आणि लवकरच बहुधा बांगलादेशात भारताविरुद्ध फारसे ममत्व नसलेली सरकारे असतील. त्यात पुन्हा चीनची छाया या सर्व देशांवर आणि त्यांच्या राजकारणावर पडलेली आहे. चीनच्या दृष्टीने ही भारताविरुद्ध आघाडी सशक्त करण्याची आणखी एक संधी ठरते. अशा परिस्थितीत उदारमतवादी धोरण, लोकशाही मूल्ये आणि आपली स्वतःची क्षमतावृद्धी हेच मार्ग उरतात. आसपासच्या बहुतेक देशांतील नेत्यांमध्ये आजही संकुचित सांस्कृतिक किंवा धार्मिक नजरेतून वावरण्याची प्रवृत्ती जोरकस आहे. यातूनच आर्थिक वास्तवाकडे आणि अपरिहार्यतेकडे डोळेझाक केली जाते. काही काळाने प्रखर सांस्कृतिक वा धार्मिक जाणिवांतील फोलपणा कळून येतो.

# या '3' घरगुती फ्रूट मास्कने करा

## सनटॅनच्या समस्येला अलविदा!

उन्हात काळवंडलेली त्वचा पुन्हा तजेलदार करण्यासाठी ब्युटीपार्लरच्या ट्रीटमेंटपेक्षा करा हे घरगुती उपाय. वीकेंडला घरच्या घरी काही फळांच्या मदतीने त्वचा (exfoliate) मोकळी करून सौंदर्य खुलवण्यासाठी कॉस्मोलॉजिस्ट यांनी सुचवलेले हे काही उपाय नक्की अजामावून पाहा.



### कलिंगड आणि काकडीचा मास्क

कलिंगडामध्ये पाण्याचा अंश अधिक असतो. त्यामुळे त्वचा मऊ आणि तजेलदार राहण्यास मदत होते. काकडीमध्ये पाणी मुबलक असल्याप्रमाणेच ब्लिचिंग क्षमताही आढळते. यामुळे टॅन कमी करण्यास आणि त्वचेचा रंग हलका करण्यास मदत होते.

**कसा बनवाल**

▮कलिंगड आणि काकडीचा पल्प एकत्र करा. तयार मिश्रण चेहऱ्यावर लावा.

▮rq मिनिटांनंतर चेहरा थंड पाण्याने स्वच्छ करा.

### पीच आणि टोमॅटोचा मास्क

पीचमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. यामुळे त्वचेचे पोषण होते. पीचमधील मॉईश्चरायझिंग घटक आणि टोमॅटोमधील क्लिन्जिंक करण्याचे गुणधर्म त्वचेला अधिक तजेलदार बनवते.

**कसा कराल हा पॅक**

▮एक पीच आणि टोमॅटो यांची एकत्र पेस्ट करावी.

▮यामध्ये एक चमचाभर मध मिसळा.

▮तयार मिश्रण चेहऱ्यावर लावावे. त्यानंतर अर्ध्या तासाने चेहरा कोमट पाण्याने स्वच्छ धुवा.

▮अशा घरगुती मास्कचा नियमित आणि योग्य पद्धतीने वापर केल्यास त्वचा अधिक तजेलदार होण्यास मदत होते. टॅन काढण्यासोबतच सौंदर्य खुलवण्यास या मास्कचा उपयोग होतो.



### ॲव्हॅकॅडो आणि पपई

ॲव्हॅकॅडोमध्ये व्हिटॅमिन ई घटक मुबलक असल्याने त्वचा आरोग्यदायी राहण्यास तसेच उजळण्यास मदत होते. पपई टॅन कमी करण्यास मदत करते. तसेच व्हिटॅमिन ए घटक त्वचेला पोषण देतात.

**कसा बनवाल मास्क**

▮एका मोठ्या वाटीमध्ये चार टीस्पून ॲव्हॅकॅडोची पेस्ट आणि पपईची पेस्ट मिसळा.

▮त्यामध्ये १ टीस्पून बदामाचे तेल आणि ३-४ थेंब ylang-ylang essential oil मिसळा.

▮या पॅकने चेहऱ्यावर आणि मानेवर मसाज करा. हा मास्क ५-१० मिनिटे ठेवा.

▮त्यानंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुवा. थोड्या वेळाने चेहरा सुती कापडाने कोरडा करा. त्यानंतर चेहऱ्यावर मॉईश्चरायझर लावा.

▮हा उपाय नियमित करा.




## ग्रीन कॉफीदेखील आरोग्यासाठी लाभदायक

सकाळी उठल्यावर वाफाळत्या कॉफीचा कप कोणाला नकोसा असेल? विशेषतः थंडीमध्ये किंवा पावसाच्या दिवसांमध्ये कॉफी मिळाली की मोसमाचा आनंद आणखीनच वाढतो, आणि शरीराची मरगळ दूर होऊन शरीरामध्ये नवे चैतन्य येते. पण केवळ शरीराची मरगळ दूर करणे आणि शरीरामध्ये चैतन्य निर्माण करणे एवढ्यापुरताच कॉफीचा उपयोग नाही. कॉफीचे सेवन आपल्या आरोग्याच्या दृष्टीने देखील फायद्याचे ठरण्यासाठी ग्रीन टीप्रमाणेच ग्रीन कॉफीचे सेवन करणे गरजेचे आहे. कॉफीच्या बिया भाजण्याच्या आधी हिरव्या असतात. याच बियांपासून तयार केली गेलेली कॉफी आरोग्यासाठी उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. ही कॉफी आरोग्याच्या दृष्टीने कशाप्रकारे उपयोगी आहे हे जाणून घेऊ या. ग्रीन कॉफीमध्ये कॅफीनचे प्रमाण कमी असते. तसेच यामध्ये असलेले क्लोरोजेनिक ॲसिड वजन घटविण्यास सहाय्यक आहे. या तत्त्वामुळे शरीराच्या चयापचय शक्तीला चालना मिळत असून, शरीरातील ब्लड शुगर लेव्हल नियंत्रित राहण्यास मदत होते. शरीरातील साठून राहिलेले ग्लुकोज आणि चरबीचे प्रमाण या कॉफीच्या सेवानाने कमी होऊ लागते. त्यामुळेच संतुलित आहार आणि नियमित व्यायाम यांच्या जोडीने ग्रीन कॉफीचे सेवन वजन घटविण्याच्या दृष्टीने फायद्याचे ठरते. क्लोरोजेनिक ॲसिडमध्ये पोटॅशियमचे प्रमाण जास्त असून यामध्ये सोडियमचे प्रमाण कमी असते. यामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. त्याचप्रमाणे ग्रीन कॉफीच्या बिया कच्च्या आणि कोणत्याही प्रक्रिया केलेल्या नसल्यामुळे यांच्यामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण अधिक असते.

म्हणूनच ग्रीन कॉफीच्या सेवनाने शरीरावर हानीकारक फ्री रॅडिकल्सचा प्रभाव कमी होतो. तसेच ग्रीन कॉफीमध्ये असणारे राहिडिक ॲसिड त्वचेला आर्द्रता प्रदान करणारे आहे.

## त्वचेच्या संसर्गापासून मुक्ती मिळवण्यासाठी घरगुती उटणे



**साहित्य :**

एक वाटी मसूर डाळीचे पीठ, कच्चे तांदूळ एक चतुर्थांश कप, आठ बदाम, अर्धा कप गव्हाचा सांजा, चिमूटभर हळद, गुलाबपाणी

**कृती व वापरण्याची पद्धत**

▮ मसूर डाळ, तांदूळ आणि बदाम बारीक वाटून त्याची पूड तयार करा. ▮ या पावडरमध्ये गव्हाची भरड आणि हळद घाला. ▮ या मिश्रणात पाणी किंवा गुलाबपाणी घालून पेस्ट बनवा. ▮ ही पेस्ट चेहरा, मान आणि हातावर लावा. ▮ वाळल्यावर पाण्याने धुऊन घ्या. ▮ आठवड्यातून एकदा या उटण्याचा वापर करावा.

**हे कसे कार्य करते?**

त्वचेच्या सौंदर्यवर्धनासाठी प्राचीन काळापासून उटण्यांचा वापर केला जात आहे. हे त्वचेवरील घाण दूर करण्यास मदत करतं. हळदीत आढळणाऱ्या अँटिसेप्टिक गुणधर्मामुळे त्वचेचं संसर्गापासून संरक्षण होतं. बदाम त्वचेचं पोषण करून रंग उजळण्यास मदत करतो.

## केवळ स्वाद नव्हे तर गुणांनीही परिपूर्ण उसाचा रस

**उन्हाळ्याची** काहिली आता चांगलीच जाणवू लागली आहे आणि त्यामुळे साहजिकच लोकांची पावले आईस्क्रीम पार्लर, थंड पेये विकणाऱ्या दुकानांकडे वळू लागली आहेत. त्यातच उसाच्या गुऱ्हाळांनी म्हणजे रसवंतीगृहांनी त्यांचे संसार सुरू केले असून थंडगार, स्वादिष्ट आणि आले-लिंबू घालून केलेला गारेगार रस पिण्यासाठी गर्दी होऊ लागली आहे.

उसापासून मिळणारा हा नैसर्गिक रस केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठी खूपच फायदेशीर आहे. अँटीऑक्सिडंटनी समृद्ध असा हा रस रोगप्रतिकारक शक्ती वाढविणारा आहे. आयर्न, मॅग्नेशियम, कॅल्शियम व अन्य इलेक्ट्रोलाईट्सचे प्रमाण या रसात पुरेसे असते, त्यामुळे डीहायड्रेशन झालेल्यांना रस पिणे फार उपयुक्त ठरते. सर्वसामान्य सर्दी आणि अन्य किरकोळ साथीचे आजार रोखण्यास रस पिणे फायद्याचे आहे तसेच ताप उतरवण्यासाठी सुद्धा रस पिण्याचा उपयोग होतो कारण उसाचा रस शरीरात प्रोटीनची पातळी वाढवितो.



उसाच्या रसात कर्बोदके, प्रथिने, शिवाय आयर्न, पोटॅशियम अधिक मात्रेत असते यामुळे एक ग्लास उसाचा रस शरीरातील ऊर्जेची पातळी वाढवितो आणि शरीराचा थकवा दूर करतो. रक्तातील प्लाझ्मा आणि अन्य तरल पदार्थ वाढवितो. मूत्रपिंडाच्या विकारात म्हणजे किडनी स्टोनमध्ये रस पिणे फायद्याचे आहे. तसेच हा रस दात किडणे आणि श्वास दुर्गंधी रोखणारा आहे.

यकृत म्हणजे लिव्हरला बळ देणारा असल्याने कावीळ झाल्यास उसाचा रस द्यावा, असे सांगितले जाते. आयुर्वेदानुसार उसाच्या रसाचे सेवन बद्धकोष्ठता दूर करणारे आहे आणि रसात असलेल्या क्षारांमुळे पित्त, पोटातील जळजळ दूर होते. उसाच्या रसात ए तसेच सर्व प्रकारची बी व्हिटॅमिन्स असतात, म्हणूनही उसाचा रस आरोग्यवर्धक ठरतो. फक्त रसवंतीगृहात रस पिताना उघड्यावरच बर्फ घालणे टाळावे तसेच रसवंतीगृहाची तेथील ग्लास, रस पिळणारे चरक यांची स्वच्छता आहे याची खात्री करून घ्यावी.

## शरीरासाठी अतिशय घातक आहे साबुदाणा;

### उपवास, व्रत-वैकल्यांसाठी वापरण्याआधी जाणून घ्या गुणधर्म



**हिंदू** धर्मासह इतरही धर्मांत अनेक सण-उत्सव, व्रत-वैकल्ये केली जातात, उपवास ठेवले जातात. यामध्ये एक समान गोष्ट असते ती म्हणजे उपवासाचे पदार्थ. उपवासादरम्यान जवळजवळ सर्व घरांत हमखास वापरण्यात येणारा पदार्थ म्हणजे साबुदाणा. तसाही साबुदाणा पूर्ण वर्षात विविध कारणांनी वापरला जातो, अनेक ठिकाणी साबुदाणा खिचडी, साबुदाणा वडे हे नाश्त्याचे पदार्थ म्हणून त्याला पसंती दिली जाते. मात्र इतक्या मोठ्या प्रमाणात वापरण्यात येणारा साबुदाणा आपल्या शरीरासाठी लाभदायक आहे का, याचा कधी विचार केला आहे?

**साबुदाणा शरीरासाठी आहे अतिशय घातक, तुम्हीच पाहा कारणे –**

▮ साबुदाण्याचा जन्म हा इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपाईन्स या देशांत झाला. साबुदाणा हा सागो झाडांपासून कृत्रिमरीत्या तयार केला जातो. यामध्ये कर्बोदकांचे प्रमाण अतिशय जास्त आहे, त्यामुळे वजन वाढण्यासाठी हा कारणीभूत ठरू शकतो.

▮१०० ग्रॅम साबुदाण्यामध्ये मध्ये ९४ ग्रॅम कर्बोदके, ०.२ ग्रॅम प्रथिने, ०.५ ग्रॅम तंतुमय घटक व फक्त १० ग्रॅम कॅल्शिअम असते. यावरून लक्षात येते की शरीरासाठी (वजन वाढवण्याखेरीज) तसा या पदार्थाचा काहीच उपयोग नाही.

▮साबुदाण्यापासून पदार्थ बनवण्यासाठी त्यात जे पदार्थ वापरले जातात, त्यामध्ये बटाटा, शेंगदाणे कुट व इतर काही घटकांचा समावेश असतो. हे घटक पचायला अतिशय जड असतात यामुळे पित्त वाढणे, पोट फुगणे, पोट दुखणे, भूक मंदावणे अशा समस्या उद्भवतात.

▮साबुदाणा आतड्यातील सर्व द्राव शोषून घेत असल्याने आपली मलप्रवृती सुद्धा कठीण होते. तसेच साबुदाण्यामुळे पित्ताचा त्रासही वाढतो.

अशाप्रकारे ज्या दिवशी हलका आणि प्रमाणात आहार घ्यायचा त्याच दिवशी, म्हणजे उपवासाच्या दिवशी आपण साबुदाण्यासारखा जड पदार्थ खाऊन स्वतःच्या शरीराचे नुकसान करून घेत आहोत.

**आयुर्वेदानुसार मनुकांमध्ये भरपूर मात्रेत औषधी गुण असतात. आम्हाला रोज ४-५ मनुका खायलाच पाहिजे. मनुकांना सर्दी-खोकला आणि कफ दूर करण्याचे सर्वात उत्तम औषध मानले जाते. त्याशिवाय देखील मनुकांचे बरेच फायदे असतात. त्यात उपस्थित न्यूट्रिएंट्स बऱ्याच आजारांमध्ये फायदेशीर ठरतात. तर जाणून घेऊ रोज मनुका खाण्याचे काय फायदे आहेत...**

## रोज करा ५ मनुकांचे सेवन आणि बघा त्याचे फायदे

▮ मनुका खाल्ल्याने ब्लड सर्क्युलेशन इम्प्रुव्ह होते. यामुळे त्वचेची रंगत वाढते आणि रंग देखील निखरण्यास मदत होते.

▮ मनुकांमध्ये फायबर्स असतात. हे डायजेशन योग्य ठेवण्यास मदत करतात.

▮ यात पोटॅशियमची मात्रा जास्त असते. मनुका हार्ट अ‍ॅटॅकच्या आजारांमध्ये इफेक्टिव्ह आहे.

▮ यात आयर्न असतं. हे ॲनिमिया (रक्ताची कमतरता) दूर करण्यास फायदेशीर ठरतात.

▮ यात अँटीऑक्सिडेंट्स असतात. यामुळे कॅन्सरसारख्या गंभीर आजारांपासून बचाव होण्यास मदत मिळते.

▮ यात अँटीबॅक्टेरियल गुण असतात. यामुळे सर्दी-खोकला ठीक होण्यास मदत मिळते.

▮ यात बीटा कॅरोटिन असते, जे डोळ्यांसाठी फायदेशीर ठरतं.

▮ यात ऑक्झेलिक ॲसिड असतं. यामुळे दात मजबूत होतात. यामुळे गम प्रॉब्लेमपासून बचाव होतो.

▮ यात कॅल्शियमची मात्रा अधिक असते. म्हणून जॉइंट पेनपासून बचाव होतो.

▮ याचे सेवन केल्याने बॉडीचे टॉक्सिन्स दूर होऊन हेअर फॉलची समस्या देखील दूर होते.




**मनुका खाण्याचे हेल्दी मार्ग**

▮कब्ज दूर करण्यासाठी रात्री पाच मनुका आणि एक लसणाची कळी खायला पाहिजे.

▮मनुकांत मध मिसळून खाल्ल्याने देखील फायदा होतो.

▮याला दुधात उकळून त्याचे सेवने केल्याने देखील फायदा होतो.

## जास्त मीठ खाल्ल्याने होऊ शकतो मधुमेह



**मधुमेहापासून** स्वतःला दूर ठेवायचे असेल तर केवळ साखर खाणे सोडून चालणार नाही. कारण, नुकत्याच करण्यात आलेल्या एका नव्या संशोधनानुसार जास्त मीठ खाणेही बनू शकते मधुमेहाचे कारण. संशोधकांच्या मते जास्त मीठ म्हणजे सोडियम खाल्ल्याने उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होते.

मात्र, आता नव्या संशोधनामुळे जास्त मीठ खाणे हे कारण मधुमेह हा आजार होण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडते. लिस्बनमध्ये आयोजित युरोप असोसिएशन फॉर द स्टडी ऑफ डायबेटिसच्या वार्षिक बैठकीत यासंबंधी माहिती देण्यात आली.

जे लोक दिवसभरात २.५ ग्रॅमपेक्षाही जास्त मीठ खातात, त्यांना टाइप २ डायबेटिसचा धोका ४३ टक्क्यांहून अधिक असतो. तसेच शरीराच्या आवश्यकतेपेक्षा ७.३ ग्रॅम जास्त मीठ खात असाल, तर टाइप २ डायबेटिसचा धोका वाढून तो ७२ टक्क्यांवर पोहोचतो.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ्र श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ्र गाळा नं. ४, एन.के.इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ्र श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणा-या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८ . Email ID : policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE – UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At – 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist – Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor – Mr. Dr. Deepak MoreshwarNaik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com